## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (आयोग) आस्थापनेवर नियमित तत्त्वावर नामनिर्देशनाने संचालक (विधी) आणि संगणक प्रणाली प्रशासक या पदांच्या भरतीसाठी सविस्तर जाहिरात**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग), नियमित तत्त्वावर नामनिर्देशनाने आपल्या आस्थापनेवर संचालक (विधी) आणि संगणक प्रणाली प्रशासक यांच्या नियुक्तीकरिता ऑनलाईन अर्ज मागवित आहे. उमेदवारांना आयोगाच्या या https://www.merc.gov.in संकेत-स्थळावर दिलेल्या लिंकच्या माध्यमातून अर्ज करण्याची विनंती करण्यात येते.

**टिप: भरतीची ही प्रक्रिया Writ Petition क्रं. १००३१/२०२२ च्या अंतिम निकालाच्या अधीन राहील.**

१. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांका रोजी किंवा त्यापूर्वी ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतरच केवळ नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होईल.

२. अर्ज करण्यापूर्वी, उमेदवारांनी दिनांक ०१.०६.२०२२ रोजी पदासाठीचे पात्रता निकष ते पूर्ण करीत असल्याबाबत खातरजमा करावी.

३. उमेदवारांनी सर्व आवश्यक दस्तऐवज (संक्षिप्त स्व-परिचयपत्र, ओळखपत्राचा पुरावा, वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, जात प्रमाणपत्र इ.) अपलोड करणे आवश्यक आहे, तसे न झाल्यास त्यांची उमेदवारी परीक्षा/लघु-सूची/मुलाखतीसाठी विचारात घेतली जाणार नाही.

४. दस्तऐवजांच्या पूर्ण पडताळणीशिवाय अर्जांची लघु-सूची तात्पुरती राहील. उमेदवारांची उमेदवारी, जेव्हा उमेदवार मुलाखतीसाठी येतील तेव्हा (जर बोलावले तर), सर्व तपशील/कागदपत्रांची मूळ दस्तऐवजांशी पडताळणी करण्याच्या अधीन राहील.

५. जर उमेदवाराला मुलाखतीसाठी बोलावण्यात आले आणि तो/ती पात्रता निकष (वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव, जात प्रमाणपत्र इ.) पूर्ण करीत नसल्याचे आढळून आले तर त्याला/तिला मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.

६. उमेदवारांनी सविस्तर तपशील आणि अद्ययावत माहितीसाठी आयोगाच्या या https://www.merc.gov.in संकेत-स्थळाला नियमितपणे भेट द्यावी (लघु-सूचीतील/पात्र उमेदवारांच्या यादीसह). प्रवेश पत्र/ॲडव्हाईस, जेथे आवश्यक असेल, ई-मेल द्वारा पाठविण्यात येईल किंवा आयोगाच्या संकेत-स्थळावर अपलोड करण्यात येईल (छापील प्रत पाठविण्यात येणार नाही).

७. उचित पध्दतीने अर्ज पाठविणे आवश्यक असलेले अर्ज वगळता, अर्जाची छापील प्रत आणि अन्य कागदपत्रे/दस्तऐवज या कार्यालयाकडे पाठवावयाचे नाहीत.

८. सर्व सुधारणा/ शुध्दीपत्रके फक्त आयोगाच्या उपरोल्लेखित संकेत-स्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

पदांची संख्या, पात्रता निकष आणि पदाच्या संबंधातील अन्य अटी आणि शर्ती खालीलप्रमाणेः

**पात्रता निकष आणि अन्य अटी आणि शर्तीः**

१) **पदाचे नाव : संचालक (विधी)**

**पदांची संख्याः १ (एक) - अराखीव**

**वेतन मॅट्रीक्स स्तर :** वेतन मॅट्रीक्स स्तर S-29 : १३११००-२१६६००. त्याशिवाय महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि अन्य भत्ते महाराष्ट्र शासनाच्या वेतन नियमानुसार लागू राहतील.

**शैक्षणिक अर्हताः**

मान्यताप्राप्त विद्यापीठ/विधी शाळा (लॉ स्कुल) मधील कायदेविषयक पदव्युत्तर पदवी.

**अनुभवः**

अ) पदवी प्राप्त केल्यानंतर, कोणत्याही सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील संस्था किंवा सार्वजनिक प्राधिकरण यांच्या विधीविषयक बाबी हाताळताना, न्यायिक/अर्ध-न्यायिक संस्थांसारख्या विविध न्यायालयात प्रतिनिधीत्व करण्याचा किमान १० वर्षांचा वकिलीचा अनुभव. उमेदवारास ॲडव्होकेट्स अधिनियम, १९६१ मधील व्याख्येनुसार एक ॲडव्होकेट म्हणून न्यायालय/न्यायाधिकरण/मंच इ. मध्ये वकिली करण्याचा किमान ४ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.

ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

क) संगणकविषयक ज्ञान आवश्यक.

ड) विद्युत क्षेत्र/नियामक आयोगामध्ये किमान ३ वर्ष कामाचा अनुभव असल्यास अधिक पसंती.

**वयोमर्यादा (०१/०६/२०२२ रोजी):**

उमेदवाराचे कमाल वय ४५ वर्षांहून अधिक नसावे.

अनु. जाति, अनु. जमाति, विमुक्त जाति (अ), भटक्या जमाति (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाति (क), भटक्या जमाति (ड) आणि इतर मागास वर्ग (नॉन क्रिमी लेयर) या प्रवर्गातील अर्जदारांना विहित वयोमर्यादेपेक्षा वयामध्ये ५ वर्षांची आणखी सवलत देण्यात येईल.

विहित वयोमर्यादेपेक्षा वयामध्ये आणखी सवलत (५ वर्षे) विद्युत नियामक आयोगांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी देखील लागू राहील.

२) **पदाचे नाव : संगणक प्रणाली प्रशासक**

**पदांची संख्या : १ (एक) - अराखीव**

**वेतन मॅट्रीक्स स्तर :** वेतन मॅट्रीक्स स्तर S-15 : ४१८००-१३२३००. त्याशिवाय महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि अन्य भत्ते महाराष्ट्र शासनाच्या वेतन नियमानुसार लागू राहतील.

**शैक्षणिक अर्हताः**

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेतून संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान पदविका आणि रेड हॅट सर्टीफाईड इंजिनिअर (आरएचसीइ).

*किंवा*

ब) संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान विषयात पदवी किंवा संगणक विज्ञान / माहिती तंत्रज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी आणि रेड हॅट सर्टीफाईड इंजिनिअर (आरएचसीइ).

**अनुभवः**

अ) केंद्र/राज्य शासकीय विभाग, उपक्रम किंवा विद्युत कंपन्या किंवा विद्युत नियामक आयोग किंवा प्रख्यात सॉफ्टवेअर /हार्डवेअर कंपन्यांमधील संगणक प्रणाली प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) कामाचा ४ वर्षांचा अनुभव आवश्यक,

ब) मराठी आणि इंग्रजी भाषेतील लेखी व मौखिक संवाद कौशल्य.

**वयोमर्यादा (०१/०६/२०२२ रोजी):**

उमेदवाराचे कमाल वय ३५ वर्षांहून अधिक नसावे.

अनु. जाति, अनु. जमाति, विमुक्त जाति (अ), भटक्या जमाति (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाति (क), भटक्या जमाति (ड) आणि इतर मागास वर्ग (नॉन क्रिमी लेयर) या प्रवर्गातील अर्जदारांना विहित वयोमर्यादेपेक्षा वयामध्ये ५ वर्षांची आणखी सवलत देण्यात येईल.

विहित वयोमर्यादेपेक्षा वयामध्ये आणखी सवलत (५ वर्षे) विद्युत नियामक आयोगांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी देखील लागू राहील.

**अन्य अटी :**

**१) सेवाशर्तीः**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचा-यांच्या सेवा भरती आणि सेवा शर्ती) विनियम, २००७ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कर्मचा-यांच्या सेवा भरती आणि सेवा शर्ती) (सुधारणा) विनियम, २०११ आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या सेवेच्या अटी व शर्ती आयोगाच्या कर्मचारी/अधिका-यांना लागू राहतील. हे विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उपलब्ध आहेत.

**२) निवास व्यवस्थाः**

आयोगाकडून निवास व्यवस्था करण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास निवासाची सोय स्वतः करावी लागेल.

**३) उच्च वयोमर्यादाः**

अनु. जाति, अनु. जमाति, विमुक्त जाति (अ), भटक्या जमाति (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाति (क), भटक्या जमाति (ड) आणि इतर मागास वर्ग (नॉन क्रिमी लेयर) या प्रवर्गातील अर्जदारांना विहित वयोमर्यादेपेक्षा वयामध्ये ५ वर्षांची आणखी सवलत देण्यात येईल.

विहित वयोमर्यादेपेक्षा वयामध्ये आणखी सवलत (५ वर्षे) विद्युत नियामक आयोगांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांसाठी देखील लागू राहील.

**४) योग्य मार्गाने अर्जः**

४.१ शासकीय विभाग/सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/ शासकीय उपक्रम/विद्युत कंपनीमध्ये आधीच कार्यरत असलेल्या व्यक्तिंनी योग्य मार्गाने अर्ज सादर करावा.

४.२ ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर, त्याची मुद्रीत प्रत उचित पध्दतीने सादर करण्यात यावी. ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून उशीरात उशीरा १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अर्जाची प्रत, उप संचालक (प्रशा आणि वित्त), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४०० ००५, या पत्त्यावर पाठविण्यात यावी.

४.३ उमेदवाराला वैयक्तिक मुलाखतीच्या वेळी त्याच्या नियोक्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र दाखवावे लागेल.

**५) अर्ज कसा करावा?**

**खालील बाबींसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना/कार्यपध्दतीः**

**अ. अर्जाची नोंदणी**

**ब. शुल्क अदा करणे**

**क. दस्तऐवज स्कॅन आणि अपलोड करणे**

**<u>उमेदवार दि. ०८.०६.२०२२ पासून दि. २८.०६.२०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज करु शकतील आणि अन्य कोणत्याही पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.</u>**

**<u>नोंदणी करण्याआधी ध्यानात घ्यावयाच्या विशेष बाबी</u>**

ऑनलाईन अर्ज करण्याआधी, उमेदवाराने खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहेः

एक) **स्कॅन करणे :**

- **छायाचित्र (४.५ सेमी ३.५ सेमी)**
- **स्वाक्षरी (काळ्या शाईने)**
- **डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा (पांढ-या कागदावर काळ्या किंवा निळया शाईने)**
- **हस्ताक्षरातील प्रतिज्ञापत्र (पांढ-या कागदावर काळ्या किंवा निळया शाईने) (मजकूर खाली देण्यात आला आहे)**

**वरील सर्व स्कॅन केलेले दस्तऐवज या जाहिरातीमध्ये दिलेल्या आवश्यक तपशीलाची पूर्तता करतात याची खात्री करावी.**

दोन) **कॅपिटल लेटरमधील स्वाक्षरी स्वीकारण्यात येणार नाही.**

तीन) **हाताच्या डाव्या अंगठ्याचा ठसा योग्यरित्या स्कॅन केलेला असावा आणि ठसा डागाळलेला/अस्पष्ट नसावा.** (जर उमेदवाराला डावा अंगठा नसेल, तर तो/ती ठश्यासाठी उजव्या हाताच्या अंगठ्याचा वापर करु शकेल.)

चार) **हस्तलिखित प्रतिज्ञापत्रासाठीचा नमुना खालीलप्रमाणे –**

***"I, _______ (Name of the candidate), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents in original as and when required."***

पाच) **उपरोल्लेखित हस्तलिखित प्रतिज्ञापत्र उमेदवाराच्या हस्ताक्षरात आणि केवळ इंग्रजीमध्ये असणे आवश्यक आहे. ते जर अन्य कोणाही व्यक्तीने किंवा अन्य कोणत्याही भाषेत लिहिले आणि अपलोड केले तर असा अर्ज अवैध मानण्यात येईल.** (दृष्टीहीन उमेदवारांच्या बाबतीत, जे लिहू शकत नाहीत त्यांनी प्रतिज्ञापत्र टाईप करुन घ्यावे आणि त्याखाली त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा उमटवावा आणि तपशीलानुसार दस्तऐवज अपलोड करावेत.)

सहा) **अर्जाचे आवश्यक शुल्क/कळविण्याच्या आकारांचा ऑनलाईन भरणा करण्यासाठी आवश्यक तपशील/कागदपत्रे तयार ठेवावीत.**

सात) **वैध वैयक्तिक ई-मेल आयडी आणि मोबाईल क्र. असावा, जो भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कार्यरत ठेवण्यात यावा. मविनिआ/आयोग सदर नोंदणीकृत ई-मेल आयडीवर परीक्षा इ. साठीचे प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी सूचना पाठवू शकेल. उमेदवाराकडे जर त्याचा/तिचा वैयक्तिक वैध ई-मेल नसेल तर, त्याने/तिने ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी त्याचा/तिचा नवीन ई-मेल आयडी तयार करावा आणि ई-मेल खाते आणि मोबाईल क्रमांकाची सेवा चालू ठेवावी.**

## अ. अर्जाची नोंदणी

१. उमेदवाराने आयोगाच्या https://www.merc.gov.in या संकेत-स्थळावर जावे आणि "**APPLY ONLINE**" या पर्यायावर क्लिक करावे, ज्याद्वारे नवीन स्क्रिन उघडली जाईल.

२. ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्यासाठी, "**Click here for New Registration**" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काचा तपशील, मोबाईल क्रमांक आणि ईमेल-आयडी प्रविष्ट करावा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड जनरेट होईल आणि स्क्रीनवर दिसेल. उमेदवाराने सदर तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड स्वतःकडे लिहून ठेवावा. तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड ईमेल आणि एसएमएसवर देखील पाठविण्यात येईल.

३. उमेदवार जर एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर, तो/ती भरलेली माहिती "SAVE AND NEXT" टॅबचा पर्याय निवडून जतन करु शकेल. ऑनलाईन अर्ज सादर करण्याआधी उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशीलाची पडताळणी करण्यासाठी "SAVE AND NEXT" या सुविधेचा वापर करावा आणि आवश्यकता असल्यास त्यामध्ये फेरबदल करावा. दृष्टीहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सादरीकरणापूर्वी तपशील अचूक असण्याची खातरजमा करण्यासाठी त्याची पडताळणी करावी/करुन घ्यावी.

४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावा आणि त्याची पडताळणी करावी, कारण COMPLETE REGISTRATION BUTTON वर क्लिक केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही/ त्याबाबतच्या विनंतीचा विचार करता येणार नाही.

५. उमेदवाराने स्वतःचे किंवा वडिलांचे / पतीचे नाव इ. नावांचे स्पेलिंग प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/ओळखीच्या पुराव्यामध्ये नमूद केल्यानुसार अचूक भरावे. कोणताही बदल/फेरफार आढळून आल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकेल.

६. तपशील वैध करावा आणि 'Validate your details' आणि 'Save & Next' वर क्लिक करुन अर्ज जतन (सेव्ह) करावा.

७. उमेदवार खालील मुद्दा ‘क’ मध्ये छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेल्या तपशीलाप्रमाणे छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी पुढे जाऊ शकेल.

८. उमेदवार अर्जाच्या नमुन्यातील अन्य तपशील भरण्यासाठी पुढील प्रक्रिया चालू ठेवू शकेल.

९. अर्जाचे पूर्वावलोकन (Preview) करण्यासाठी Preview Tab वर क्लिक करावे आणि COMPLETE REGISTRATION करण्यापूर्वी अर्जाच्या संपूर्ण नमुन्याची पडताळणी करावी.

१०.तपशीलामध्ये, आवश्यकता असल्यास, फेरबदल करावा आणि तुम्ही अपलोड केलेले छायाचित्र, स्वाक्षरी आणि प्रविष्ट केलेला अन्य तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यावरच 'COMPLETE REGISTRATION' वर क्लिक करावे.

११. 'Payment' टॅब वर क्लिक करावे आणि शुल्काचा भरणा करण्यासाठी पुढील प्रक्रिया चालू ठेवावी.

१२. 'Submit' वर क्लिक करावे.

**ब. <u>शुल्क अदा करणे:</u>**

**<u>ऑनलाईन पध्दत</u>**

१. अर्जाचे शुल्क (विना-परताव्याचे) रु. १०००/- (फक्त एक हजार रुपये) आहे.

२. अर्जाचा नमुना पेमेंट गेटवेसोबत एकात्मीकृत करण्यात आला आहे आणि सूचनांचे अनुसरण करुन शुल्काचा भरणा करता येऊ शकेल.

३. शुल्काचा भरणा डेबिट कार्ड (RuPay/Visa/MasterCard/Maestro), क्रेडिट कार्ड्स, इंटरनेट बँकींग, IMPS, कॅश कार्ड्स/ मोबाईल व्हॉलेट्स यांचा वापर करुन करता येऊ शकेल.

४. ऑनलाईन अर्जामध्ये शुल्कविषयक माहिती प्रविष्ट केल्यानंतर, सर्व्हरकडून माहिती प्राप्त होण्यासाठी प्रतिक्षा करा. दुहेरी शुल्क टाळण्यासाठी BACK OR REFRESH बटन दाबू नका.

५. व्यवहार यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर, ई-पावती जनरेट होईल.

६. ई-पावती जनरेट न होणे, शुल्काचा भरणा अयशस्वी PAYMENT FAILURE झाल्याचे दर्शविते. शुल्काचा भरणा अयशस्वी झाल्यास, उमेदवारांनी त्यांचा तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्डचा वापर करुन पुन्हा लॉग इन करावे आणि शुल्काचा भरणा करण्याची पुन्हा प्रक्रिया करावी.

७. उमेदवारांनी ई-पावती आणि शुल्काच्या तपशीलाचा समावेश असलेल्या ऑनलाईन अर्जाच्या नमुन्यांची मुद्रीत प्रत काढणे आवश्यक आहे. **<u>अशी पावती जनरेट न झाल्यास, ऑनलाईन व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाला नसण्याची शक्यता असते याची कृपया नोंद घ्यावी.</u>**

८. क्रेडीट कार्ड वापरकर्त्यांसाठीः सर्व आकार भारतीय रुपयामध्ये देण्यात आले आहेत. आपण अ-भारतीय क्रेडीट कार्डचा वापर करीत असाल तर, आपली बँक विद्यमान एक्स्चेंज दराच्या आधारावर स्थानिक चलनामध्ये रुपांतरीत करील.

९. तुमच्या माहितीच्या (डेटा) सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी, तुमचा व्यवहार पूर्ण झाल्यावर ब्राउझर विंडो कृपया त्वरित बंद करावी.

१०. **शुल्काचा भरणा केल्यानंतर शुल्काचा तपशील समाविष्ट असलेल्या अर्जाच्या नमुन्याची मुद्रीत प्रत घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.**

## क. <u>दस्तऐवज स्कॅन आणि अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना</u>

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराकडे खाली देण्यात आलेल्या तपशीलानुसार त्याचे/तिचे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित प्रतिज्ञापत्र यांची स्कॅन केलेली (डिजिटल) प्रतिमा असणे आवश्यक राहील.

छायाचित्र : (४.५ सेमी x ३.५ सेमी)

- छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीतील रंगीत असणे आवश्यक आहे.
- छायाचित्र रंगीत, फिकट-रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर घेतलेले असावे.
- कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे.
- ऊन असताना फोटो काढावयाचा असेल तर सूर्य तुमच्या मागे असेल किंवा आपण सावलीत असाल असे पहावे, जेणेकरुन आपले डोळे अंशतः बंद होणार नाहीत आणि गडद सावली नसेल.
- फ्लॅशचा वापर करावयाचा असल्यास "red-eye" येणार नाही याची दक्षता घ्यावी.
- चष्मा वापरत असल्यास प्रतिबिंब येणार नाही याची तसेच डोळे स्पष्ट दिसतील याची दक्षता घ्यावी.
- टोपी, हॅट आणि गडद रंगाचा चष्मा नसावा. धार्मिक शिरस्त्राण अनुज्ञेय राहील, परंतु त्याने तुमचा चेहरा झाकला जाता कामा नये.
- २०० x ३०० पिक्सल्स (प्राधान्य)

- फाईलचे आकारमान २० केबी - ५० केबी दरम्यान असावे.
- स्कॅन केलेल्या प्रतिमेचे आकारमान ५० केबी पेक्षा जास्त नसल्याची खात्री करावी. फाईलचे आकारमान ५० केबी पेक्षा जास्त असेल तर स्कॅनिंग करताना डिपीआय रिझोल्युशन, रंगांची संख्या इ. पर्यायांनी स्कॅनरची सेटिंग्ज जुळवून घ्यावी.

स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित प्रतिज्ञापत्राची प्रतिमा :

- अर्जदाराने पांढऱ्या कागदावर काळ्या रंगाच्या शाईच्या पेनाने स्वाक्षरी करावी.
  - आकार १४० x ६० पिक्सल्स (प्राधान्य)
  - फाईलचे आकारमान १० केबी- २० केबी दरम्यान असावे. स्कॅन केलेल्या प्रतिमेचे आकारमान २० केबी पेक्षा जास्त असणार नाही याची खात्री करावी.
- अर्जदाराने पांढऱ्या कागदावर काळ्या किंवा निळ्या शाईने आपल्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा उमटवावा.
  - फाईलचा प्रकार : JPG/ JPEG
  - आकार : २०० dpi मध्ये (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्याने) २४० x २४० पिक्सल्स म्हणजेच ३ सेमी *३ सेमी (रुंदी *ऊंची)
  - फाईलचे आकारमान : २० केबी - ५० केबी
- अर्जदाराने पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने इंग्रजीमध्ये प्रतिज्ञा पत्र लिहावे.
  - फाईलचा प्रकार : JPG / JPEG
  - आकार : २०० dpi मध्ये ८०० x ४०० पिक्सल (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्याने) म्हणजेच १० सेमी *५ सेमी (रुंदी *ऊंची)
  - फाईलचे आकारमान : ५० केबी - १०० केबी
- स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित प्रतिज्ञापत्र अर्जदाराचे स्वतःचे असावे आणि अन्य कोणत्याही व्यक्तिचे नसावे.
- परीक्षेच्या वेळी अर्जदाराची हजेरीपत्र किंवा प्रवेश पत्रावरील स्वाक्षरी त्याने अपलोड केलेल्या स्वाक्षरीसोबत जुळली नाही, तर अर्जदार अपात्र ठरविण्यात येईल.
- CAPITAL LETTERS मधील स्वाक्षरी / हस्तलिखित प्रतिज्ञापत्र स्वीकारण्यात येणार नाही.

दस्तऐवज स्कॅन करणे :

- स्कॅनरचे रिझोल्युशन किमान २०० dpi वर (dots per inch) जुळवून घ्यावे.
- रंग True Colour वर जुळवून घ्यावा.
- फाईलचे आकारमान वर विनिर्दिष्ट केल्यानुसार असावे.
- छायाचित्र/स्वाक्षरी/डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा/हस्तलिखित प्रतिज्ञापत्र यांच्या प्रतिमेची कडा स्कॅनरमध्ये क्रॉप करावी, त्यानंतर अंतिम आकारामध्ये (वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे) प्रतिमा क्रॉप करण्यासाठी अपलोड एडीटरचा वापर करावा.
- इमेज फाईल JPG or JPEG format मध्ये असावी. उदाहरणार्थ, फाईलचे नाव image01.jpg or image01.jpeg. असेल तर त्याच्या प्रतिमेच्या आकारमानाची तपासणी फोल्डर फाईल्सची लिस्टिंग करुन किंवा फाईल इमेजच्या आयकॉनवर माऊस फिरवून करता येईल.
- MS Windows/MSOffice चा वापर करणाऱ्या उमेदवारांना MS Paint or MSOffice Picture Manager चा वापर करुन डॉक्युमेंट सहजपणे .jpeg मध्ये प्राप्त करता येईल. कोणत्याही फॉरमॅटमध्ये स्कॅन केलेले दस्तऐवज File menu मधील 'Save As' पर्यायाचा वापर करुन .jpg / .jpeg format मध्ये जतन (सेव्ह) करता येतील. क्रॉप टूलचा वापर करुन आणि रिसाईजचा पर्याय स्वीकारुन फोटोचा आकार कमी/जास्त करता येईल.

**दस्तऐवज अपलोड करण्याची पध्दती :**

- ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित प्रतिज्ञापत्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक्स देण्यात येतील.
- "Upload Photograph / signature / Upload left thumb impression / hand written declaration" यापैकी संबंधित लिंकवर क्लिक करावे.
- ब्राऊझ करुन जेथे स्कॅन केलेले छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित प्रतिज्ञापत्राची फाईल जतन (सेव्ह) करण्यात आलेली असेल त्याची निवड करावी.
- त्यावर क्लिक करुन फाईलची निवड करावी.

- ‘Open/Upload’ बटनवर क्लिक करावे. जोपर्यंत तुम्ही विनिर्दिष्ट केल्यानुसार तुमच्या हाताच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित प्रतिज्ञापत्र अपलोड करीत नाहीत तोपर्यंत तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत केला जाणार नाही.
- फाईलचे आकारमान आणि फॉरमॅट विहित केल्याप्रमाणे नसेल, तर स्क्रीनवर error message दिसेल.
- अपलोड केलेल्या प्रतिमेच्या पूर्वावलोकनामुळे (Preview) प्रतिमेची गुणवत्ता पाहण्यास मदत होईल. अस्पष्ट/डागाळलेली प्रतिमा असल्यास, अपेक्षित सुस्पष्ट प्रतिमेसाठी ती पुन्हा अपलोड करता येईल.

विनिर्दिष्टित केल्याप्रमाणे जोपर्यंत छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा आणि हस्तलिखित प्रतिज्ञापत्र अपलोड केले जात नाही तोपर्यंत तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत केला जाणार नाही.

टिपः

(१) जर छायायित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा किंवा हस्तलिखित प्रतिज्ञापत्र अस्पष्ट/डागाळलेले असेल तर उमेदवाराचा अर्ज नाकारण्यात येऊ शकेल.

(२) ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा किंवा हस्तलिखित प्रतिज्ञापत्र अपलोड केल्यानंतर उमेदवाराने प्रतिमा स्पष्ट आणि अचूकपणे अपलोड झालेली आहे याबाबत खात्री करावी. जर छायायित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा किंवा हस्तलिखित प्रतिज्ञापत्र स्पष्टपणे दिसत नसेल तर उमेदवार त्याचा/तिचा अर्ज एडीट करु शकेल आणि अर्ज सादर करण्यापूर्वी छायायित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा किंवा हस्तलिखित प्रतिज्ञापत्र पुन्हा अपलोड करु शकेल.

(३) छायाचित्राच्या ठिकाणी छायाचित्र आणि स्वाक्षरीच्या ठिकाणी स्वाक्षरी अपलोड झाल्याबाबत उमेदवाराने खात्री करावी. जर छायाचित्राच्या ठिकाणी छायाचित्र आणि स्वाक्षरीच्या ठिकाणी स्वाक्षरी उचितपणे अपलोड झाली नाही तर उमेदवाराला परीक्षेला उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(४) उमेदवाराने अपलोड केलेले छायाचित्र आवश्यक असलेल्या आकाराचे आणि चेहरा स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी.

(५) छायाचित्राच्या जागी छायाचित्र अपलोड करण्यात आले नसेल तर परीक्षेसाठी प्रवेश नाकारण्यात/फेटाळण्यात येईल. उमेदवार त्यासाठी जबाबदार राहील.

(६) अपलोड केलेली स्वाक्षरी स्पष्टपणे दिसेल याची उमेदवाराने खात्री करावी.

(७) ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवाराने प्रणालीने जनरेट केलेल्या ऑनलाईन अर्जाच्या नमुन्याची मुद्रीत प्रत घ्यावी.

## (६) लेखी परीक्षा –

(एक) **उशीरा येणारा उमेदवार** म्हणजे परीक्षेसाठीच्या प्रवेश पत्रावर वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेश पत्रावर उल्लेख केलेली उपस्थितीची वेळ (रिपोर्टिंग टाइम) परीक्षेस प्रारंभ होण्याच्या आधीची आहे.

**(दोन) ओळख पडताळणी**

परीक्षा कक्षामध्ये तसेच मुलाखतीच्या वेळी, उमेदवाराचे अलीकडील वैध फोटो ओळखपत्र (प्रवेश पत्रावर असल्याप्रमाणे तंतोतंत नाव असलेले) जसे की, पॅन कार्ड/पारपत्र/कायस्वरुपी वाहनचालक परवाना/मतदार ओळखपत्र/बँकेचे फोटोसह पासबुक/राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत लेटरहेडवर जारी केलेले ओळखपत्र फोटोसह/लोकप्रतिनिधीने अधिकृत लेटरहेडवर जारी केलेले ओळखपत्र फोटोसह/मान्यताप्राप्त महाविद्यालय/विद्यापिठ/आधार कार्ड/ई-आधार कार्डद्वारे जारी केलेले अलीकडील वैध फोटो ओळखपत्र/कर्मचारी ओळखपत्र/बार कॉन्सिलचे फोटो ओळखपत्र यांची मूळ प्रत आणि त्यांच्या छायांकित प्रती पर्यवेक्षकांकडे पडताळणीसाठी सादर कराव्यात. उमेदवाराच्या ओळखीची पडताळणी त्याचे/तिचे प्रवेश पत्र, उपस्थितांची यादी आणि सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजांमधील तपशीलाशी करण्यात येईल. उमेदाराच्या ओळखीबाबत शंका असल्यास उमेदवाराला परीक्षेसाठी उपस्थित राहण्यास परवानगी दिली जाणार नाही.

रेशन कार्ड आणि शिकाऊ वाहनचालक परवाना ओळखीचा वैध पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.

टिपः उमेदवाराने स्वतःची ओळख पटविण्यासाठी आवश्यक ते मूळ दस्तऐवज, त्या दस्तऐवजांच्या छायांकित प्रती, परीक्षेच्या प्रवेशपत्र तसेच मुलाखतीसाठीच्या प्रवेश पत्रासह अनुक्रमे परीक्षेला/मुलाखतीला उपस्थित राहताना सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र/प्रतिज्ञापत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**(तीन) परीक्षा केंद्राबाबत सूचनाः**

१.**परीक्षा संबंधित प्रवेश पत्रावर देण्यात** आलेल्या ठिकाणी ऑनलाईन घेण्यात येईल.

२. परीक्षेसाठीचे केंद्र/स्थळ/दिनांक/सत्र यामध्ये बदल करण्याची विनंती मान्य करण्यात येणार नाही.

३. तथापि, आयोग, प्रतिसाद, प्रशासकीय व्यवहार्यता इ, वर अवलंबून, कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करण्याचा आणि/किंवा अन्य काही केंद्रांची भर घालण्याचा हक्क, आपल्या स्वेच्छाधिकारात, राखून ठेवतो.

४. उमेदवार परीक्षेसाठी त्याच्या/तिच्या स्वतःच्या जबाबदारीवर आणि खर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहील आणि आयोग कोणत्याही स्वरुपाच्या इजा किंवा नुकसानीसाठी जबाबदार राहणार नाही.

५. उमेदवाराने एकदा निवडलेले केंद्र अंतिम राहील.

जर बऱ्याच उमेदवारांनी "ऑनलाईन" परीक्षेसाठी विशिष्ट केंद्राची निवड न केल्यास अशा उमेदवारांना अन्य कोणत्याही लगतच्या केंद्राचे वाटप करण्याचा अधिकार आयोग राखून ठेवत आहे किंवा ऑनलाईन परीक्षेकरिता एखाद्या केंद्रातील उमेदवारांची संख्या उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त असेल तर आयोग उमेदवाराला अन्य कोणतेही केंद्राचे वाटप करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

(चार) **<u>लेखनिकाची मदत घेणा-या दिव्यांग व्यक्तिंसाठी मागदर्शक सूचना</u>**

दृष्टिहिन उमेदवार आणि ज्यांचा लिखाणाच्या गतीवर/टंकलेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणामुळे कायमस्वरुपी विपरीत परिणाम झाला आहे असे उमेदवार त्यांच्या स्वतःच्या खर्चाने ऑनलाईन परीक्षेदरम्यान लेखनिकाचा वापर करु शकतात. अशा सर्व प्रकरणी, जेथे लेखनिकाचा वापर करण्यात येतो, खालील नियम लागू राहतीलः

- उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था त्याच्या/तिच्या स्वतःच्या खर्चाने करावी लागेल.
- उमेदवाराकडून व्यवस्था केलेला लेखनिक त्याच परीक्षेसाठीचा उमेदवार असता कामा नये. परीक्षा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील अटीचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले तर उमेदवार आणि लेखनिक या दोघांचीही उमेदवारी रद्द करण्यात येईल. लेखनिकाची मदत घेण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारास परीक्षेमध्ये लेखनिक घ्यावयाचा असेल तर त्याने ऑनलाईन अर्जामध्ये तसे न चुकता काळजीपूर्वक नमूद करावयास हवे. त्यानंतर केलेली कोणतीही विनंती अनुकूलपणे विचारात घेतली जाणार नाही.
- एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणारी व्यक्ती दुसऱ्या उमेदवारासाठी लेखनिक राहू शकणार नाही.
- लेखनिक कोणत्याही शैक्षणिक शाखेचा असू शकतो. तथापि, विशेषज्ञ अधिकाऱ्यांच्या पदासाठी लेखनिक त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक शाखेपेक्षा वेगळ्या शाखेतील असावा. सदर दोन्ही पदे विशेषज्ञ अधिकाऱ्यांची आहेत.

- उमेदवार तसेच लेखनिक या दोघांनाही योग्य हमीपत्र द्यावे लागेल की, सदर लेखनिक लेखनिकासाठी लागू असलेल्या वर उल्लेख केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करतो. त्याशिवाय जर त्यानंतर असे उघडकीस आले की, तो/ती ठरवून दिलेल्या कोणत्याही पात्रता निकषांची पूर्तता करीत नाही किंवा महत्वपूर्ण तथ्य दडवले आहे, तर ऑनलाईन परीक्षेचा निकाल विचारात न घेता अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.
- लेखनिकाची मदत घेणारे उमेदवार प्रत्येक तासासाठी २० मिनिटे याप्रमाणे किंवा अन्यथा सूचित केल्याप्रमाणे अनुग्रह कालावधी मिळण्यासाठी पात्र राहतील.
- लेखनिकाने स्वतःहून उत्तर लिहू नये. अशा तऱ्हेची वर्तणूक निदर्शनास आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.
- अनुग्रह कालावधीसाठी नोंदणी झालेल्या उमेदवारांनाच केवळ अशी सवलत अनुज्ञेय राहील, कारण उमेदवारांना देण्यात येणारा अनुग्रह कालावधी संगणक प्रणालीवर आधारीत असल्यामुळे, जर त्याने/तिने अनुग्रह कालावधीसाठी नोंदणी केलेली नसल्यास परीक्षा घेणाऱ्या एजन्सीसाठी अशा अनुग्रह कालावधीस परवानगी देणे शक्य होणार नाही. अनुग्रह कालावधीसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशी सवलत अनुज्ञेय राहणार नाही.
- परीक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, असे निदर्शनास आले की, लेखनिक प्रश्नांची उत्तरे स्वतंत्रपणे देत आहे, तर परीक्षा सत्र समाप्त करण्यात येईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. परीक्षा प्रशासक कर्मचाऱ्याने परीक्षा झाल्यानंतर लेखनिक प्रश्नांची उत्तरे स्वतंत्रपणे देत असल्याचे कळविले तर असा लेखनिक वापरणाऱ्या उमेदवाराची उमेदवारी देखील रद्द करण्यात येईल,

(पाच) **अस्थिव्यंग अक्षमता (locomotor disability) आणि मेंदूचा पक्षघात (cerebral palsy) असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना**

अस्थिव्यंग अक्षमता (locomotor disability) आणि मेंदूचा पक्षघात (cerebral palsy) असलेल्या उमेदवारांसाठी, ज्याच्यामुळे त्यांच्या लेखन क्षमतेवर परिणाम होऊ न लिखाणाची गती कमी होते त्यांना, प्रत्येक तासासाठी २० मिनिटे याप्रमाणे किंवा अन्यथा सूचित केल्याप्रमाणे अनुग्रह अनुज्ञेय असेल.

(सहा) **दृष्टीहिन उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना**

- दृष्टीहिन उमेदवार (ज्यांना ४० पेक्षा कमी अपंगत्व आहे) परीक्षेचा मजकूर मॅग्निफाईड फॉन्टमध्ये पाहण्याचा पर्याय निवडू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रत्येक तासासाठी २० मिनिटे याप्रमाणे किंवा अन्यथा सूचित केल्याप्रमाणे अनुग्रह कालावधी मिळण्यास पात्र असतील.

- परीक्षेसाठी लेखनिकाची सेवा घेणाऱ्या दृष्टीहिन उमेदवारांसाठी परीक्षेचा मजकूर मॅग्निफाईड फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही.
  या मार्गदर्शक सूचना भारत सरकारच्या वेळोवेळी जारी होणाऱ्या मार्गदर्शक सूचना/ स्पष्टीकरणांच्या, असल्यास, अधीन राहतील.

(सात) <u>अन्य तरतुदी</u>

१. परीक्षा घेताना काही अडचणी उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे परीक्षा देण्यावर आणि/किंवा परीक्षेचा निकाल तयार होण्यावर परिणाम होऊ शकेल. अशा प्रसंगी उमेदवारांना परीक्षेसाठी इतर केंद्रावर हलविणे किंवा परीक्षा विलंबाने घेणे यासारखे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. पुनर्परीक्षेचे आयोजन हे परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेच्या निर्णयावर पूर्णपणे अवलंबून आहे. उमेदवाराला पुनर्परीक्षेचा कोणताही दावा करता येणार नाही. इतर केंद्रावर जाण्याबाबत इच्छुक नसणारे किंवा परीक्षेच्या विलंबित प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक नसणारे उमेदवार या प्रक्रियेतून सरसकटपणे नाकारण्यात येतील.

२. या भरती प्रक्रिये अंतर्गत उद्‌भवणाऱ्या सर्व बाबींसाठी आयोगाचा निर्णय अंतिम राहील व तो उमेदवारांना बंधनकारक असेल. यासंबंधात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा व्यक्तिगत विचारणांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेतली गेल्यास वेगवेगळ्या सत्रांमधील वापरलेल्या टेस्ट बॅटरीजच्या काठिण्य पातळीत थोडासा फरक असल्यामुळे हा फरक जुळवून घेण्यासाठी मिळालेले गुण समिकृत केले जातील. नोड्स क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारास काही तांत्रिक व्यत्यय आल्यास एकापेक्षा जास्त सत्र घेणे आवश्यक राहील.

४. योग्य आणि चुकीच्या उत्तरांच्या समानतेचे नमुने शोधण्यासाठी वैयक्तिक उमेदवारांच्या प्रतिसादांचे (उत्तरे) अन्य उमेदवारांच्या प्रतिसादांशी विश्लेषण करील. आयोगाने या संबंधात घेतलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत असा अनुमान/निष्कर्ष काढण्यात आला की, प्रतिसाद सामायिक करण्यात आलेले आहेत आणि मिळालेले गुण खरे/वैध नाहीत, तर आयोग संबंधित उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवतो आणि अशा उमेदवारांचे (अपात्र) निकाल रोखून ठेवण्यात येतील.

५. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती आणि/किंवा प्रक्रियेचे उल्लंघन केल्याचे आढळून आले तर उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला आयोगाच्या भविष्यातील कोणत्याही निवड प्रक्रियेत उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. जर अशा घटना चालू निवड प्रक्रिये दरम्यान उघडकीस आल्या नाहीत पण त्या त्यानंतर उघडकीस आल्या तर उमेदवार पूर्वलक्षी प्रभावाने अपात्रता ठरेल.

## ६. गुण काढण्याची प्रक्रिया

खालील पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन परीक्षेमधील गुण काढण्यात येतीलः

(एक) प्रत्येक वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये उमेदवाराने अचूक उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या, चुकीच्या उत्तरासाठी दंड लावल्यानंतर, सुधारीत गुणसंख्येसाठी विचारात घेण्यात येईल.

(दोन) समिकृत गुण* काढण्यासाठी वेगवेगळया सत्रांमध्ये घेतलेल्या वस्तुनिष्ठ चाचणीमधील काठीण्य पातळीतील किरकोळ फरक, असल्यास, जुळवून घेण्यासाठी उमेदवाराने अशा रीतीने प्राप्त केलेले सुधारीत गुण सममूल्य करण्यात येतील.

*कोणत्याही चाचणीमध्ये उमेदवाराने मिळविलेले गुण सर्व फॉर्मच्या गुणांच्या वितरणाचा विचार करुन मूळ फॉर्मशी समिकृत करण्यात येतील.

(तीन) चाचणीनिहाय गुण आणि एकूण गुण दोन अंकांपर्यंत दशांश बिंदूसह कळविण्यात येतीलः

टिप ः कट-ऑफ दोन टप्प्यात लागू केले जातील –

१. वैयक्तिक चाचण्यांमधील गुणांवर

२. एकूण गुणांवर

## ७. मुलाखतीसाठी प्रवेश पत्रः

मुलाखतीसाठी सूचना / प्रवेश पत्र ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल किंवा आयोगाच्या संकेत-स्थळावर अपलोड करण्यात येईल. छापील प्रत पाठविण्यात येणार नाही.

## ८. सर्वसाधारण माहितीः

**१.** पदासाठी अर्ज करण्यापूर्वी, उमेदवाराने खात्री करावी की, तो/ती विनिर्दिष्ट दिनांका रोजी वर उल्लेखलेली पात्रता आणि अन्य नियमांची पूर्तता करतो/करते आणि त्याने/तिने सादर केलेला तपशील सर्व दृष्टीने बरोबर आहे.

**२.** भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर असे आढळून आले की, अर्जदार पात्रता नियम पूर्ण करीत नाही आणि/किंवा त्याने/तिने कोणतीही चुकीची/खोटी माहिती सादर केली आहे किंवा कोणतीही वस्तुस्थिती लपविलेली आहे, तर त्याची/तिची उमेदवारी रद्द केली जाईल. नियुक्तिनंतरही जर यापैकी कोणतीही त्रुटी आढळल्यास, त्याची/तिची सेवा समाप्त करण्यात येईल.

**३.** अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यानुसार असल्याची आणि उचितपणे आणि संपूर्ण भरल्याची खात्री करावी.

**४.** उमेदवाराने संपर्कासाठी म्हणजे प्रवेश पत्र/मुलाखतीचा दिनांक इ. कळविण्यासाठी त्यांच्या ई-मेल आयडी/मोबाईल क्रमांकाची सेवा चालू ठेवावी.

५. पाठविलेली संसूचना/संदेश मिळण्यात कोणताही विलंब झाल्यास किंवा तो मिळाला नाही तरी त्यास आयोग जबाबदार राहणार नाही.

६. पात्रता, मुलाखतीचे आयोजन, अन्य चाचण्या आणि निवड या संबंधातील आयोगाचा निर्णय अंतिम राहील आणि सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहील. या संदर्भात कोणतेही निवेदन किंवा पत्रव्यवहार आयोगाकडून करण्यात येणार नाही.

७. जर कोणत्याही लेखी चाचणीशिवाय मुलाखत ही भरतीची पध्दत असेल, तर केवळ पात्रता निकषांची पूर्तता केल्याने उमेदवाराला मुलाखतीसाठी बोलावले जाऊ शकत नाही. उमेदवाराची पात्रता, योग्यता, अनुभव इ. च्या संदर्भात प्राथमिक छाननी केल्यानंतर/लघु-सूची तयार केल्यानंतर मुलाखतीसाठी फक्त आवश्यक उमेवारांनाच बोलावण्याचा आयोगाने हक्क राखून ठेवला आहे.

८. एकापेक्षा अधिक अर्जांच्या बाबतीत, शेवटचा वैध (संपूर्ण भरलेला) अर्ज ठेवण्यात येईल आणि नोंदणीसाठी भरलेले अन्य शुल्क समपहृत करण्यात येईल. उमेदवाराला मुलाखतीस जास्त वेळा हजर राहण्याची परवानगी नाकारण्यात येते.

९. सदर जाहिरात आणि/किंवा अर्जामुळे उद्‌भवलेल्या दाव्याच्या किंवा वादाच्या संदर्भात कोणतीही कायदेशीर कार्यवाही आणि/किंवा त्याच्या प्रतिसादा दाखलचा अर्ज केवळ मुंबईतच सुरु केला जाऊ शकतो आणि कारण/वादाच्या सुनावणीचे क्षेत्र केवळ मुंबईमधील न्यायालये/न्यायाधिकरण/मंच राहील.

१०. आयोग भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा हक्क राखून ठेवतो.

## ९. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनः

शासकीय अधिसूचना क्र. SRV २०००/CR (१७/२०००)/XII, दि. २८.३.२००५, नुसार अर्जदाराला लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

## १०. वैद्यकीय स्वास्थ्य प्रमाणपत्रः

सर्व उमेदवारांना, त्यांच्या नियुक्तीपूर्वी, आयोगाला आवश्यक असल्याप्रमाणे वैद्यकीय स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

## ११. चारित्र्य/पूर्वेतिहासाची तपासणीः

सर्व नियुक्त्या वर्तणुकीच्या आणि पूर्वचारित्र्याबाबत आयोगाने वेळोवळी निश्चित केलेल्या पडताळणींना अधीन राहून असतील.

परंतु असे की, आयोगाच्या सेवेत रुजू होण्यापूर्वी शासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांच्या सेवेत अगोदरच असणा-या उमेदवारांना ही पडताळणी लागू राहणार नाही.

**१२. शिफारसः**

उमेदवाराच्या निवडीसाठी/भरतीसाठी उमेदवाराच्या वतीने शिफारस करण्यात आल्यास किंवा कोणतेही राजकीय अथवा अन्य बाह्य दडपण आणण्यात आल्यास अशा उमेदवारास भरतीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**१३. <u>अयोग्य वर्तन/अनुचित माध्यमांचा वापर केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांविरुध्द कारवाई</u>**

उमेदवारांना त्यांच्या स्वतःच्या हितासाठी असे सूचित करण्यात येते की, त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना खोटा, अनधिकृत बदल केलेला किंवा बनावट तपशील देऊ नये आणि कोणतीही महत्वाची माहिती लपवू नये. परीक्षा, मुलाखत किंवा त्यानंतरच्या कोणत्याही निवड प्रक्रियेच्या वेळी, जर उमेदवार खालील कृत्ये दोषी आढळल्यास –

१. अयोग्य मार्गाचा वापर करणे किंवा
२. तोतयेगिरी करणे किंवा कोणत्याही तोतया व्यक्तीची मदत घेणे, किंवा
३. परीक्षा कक्ष/मुलाखत कक्षामध्ये गैरवर्तणूक करणे किंवा चाचणी/चाचण्यांमधील मजकूर किंवा त्यातील कोणतीही माहिती संपूर्णपणे किंवा त्याचा भाग, कोणत्याही स्वरुपात किंवा कोणत्याही मार्गाने, कोणत्याही प्रयोजनासाठी, तोंडी किंवा लेखी, इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पुनरुत्पादित करणे, प्रसारीत करणे, साठवणे किंवा प्रसारित आणि साठवून ठेवण्यात मदत करणे, किंवा
४. त्याच्या/तिच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे, किंवा
५. त्याच्या/तिच्या उमेदवारीसाठी गैरमार्गाने पाठींबा मिळविणे, किंवा
६. परीक्षा कक्ष/मुलाखत कक्षामध्ये मोबाईल फोन किंवा संवादाची तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरणे बाळगणे, असा उमेदवार, त्याला/तिला गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह, खालील बाबींना जबाबदार राहील –
    अ. तो/ती ज्या परीक्षेसाठी उमेदवार आहेत त्या परीक्षेसाठी त्यास अपात्र ठरविण्यात येईल.
    ब. आयोगाने आयोजित केलेल्या कोणत्याही परीक्षेसाठी कायमस्वरुपी किंवा विशिष्ट कालावधीसाठी प्रतिरोधित (debarred) करण्यात येईल.
    क. तो/ती आयोगाच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची/तिची सेवा समाप्त करण्यात येईल.

**१४. अर्ज नाकारण्याचा हक्कः**

आयोग कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

**१५. प्रवास भत्ताः**

लेखी परीक्षा/मुलाखतीसाठी बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना कोणताही प्रवास भत्ता देय नसेल.

**१६. अर्ज प्राप्त होण्याची अंतिम तारीखः**

ऑनलाईन अर्ज २८.०६.२०२२ रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पाठविण्यात यावेत.

सही/-
(अभिजीत देशपांडे)
सचिव, मविनिआ

ठिकाणः मुंबई

दिनांक : ०८.०६.२०२२